
- ग्रीक मूर्ति कलेचा भारतीय कलाशैलीवर प्रभाव पडला. त्या तून पुढे गांधार नावाच्या कलाशैलीचा उदय झाला.
- ग्रीक राजांची नाणी वैशिष्ट्य पूर्ण असत. त्यावर एका बाजूला ते नाणे पाडणाऱ्या राजाचे चि त्र, तर दुसऱ्या बाजूला एखाद्या ग्रीक देवतेचे चित्र असे. नाण्या वर त्या राजाचे नाव असे. सिकंदराची नाणीही अशाच प्रकारची होती.
- तक्षशीलेचा राजा अंभी आणि झेलम आणि चिनाब नद्यांदरम्यान राज्य करणारा पोरस उर्फ पौरव हे प्रबळ राजे (पुरू) होते. अंभी हा अलेक्झांडर ला शरण आला. झेलम नदी किनारी पोरस आणि अलेक्झांडर यांच्यात युद्ध झाले. त्यात पोरस पराभूत झाला. पण पोरस चे युद्धातील शौर्य पाहून अलेक्झांडर ने त्याला राज्य परत दिले.

# मौर्य साम्राज्य

- मौर्य साम्राज्य हे भारताच्या इतिहासातील सर्वात मोठे साम्राज्य होते. (कालखंड इ.स.पू. ३२१ ते इ.स.पू. १८५) मौर्य साम्राज्याची स्थापना साम्राज्याचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य याने चाणक्य या तक्षशिला येथील त्याच्या शिक्षकाच्या मदतीने केली. ( चाणक्याची कारस्थाने त्याचे वर्णन विशाखादत्ता च्या मुद्राराक्षस या नाटकात केले आहे. )
- चंद्रगुप्त मौर्य हे मौर्य साम्राज्याचे संस्थापक तर सम्राट अशोक हे या साम्राज्यातील सर्वात प्रमुख शासक
- गंगेच्या खोऱ्यामधील मगध राज्यापासून उगम झालेल्या या साम्राज्याची राजधानी पाटलीपुत्र (आजचे पाटणा) ही होती.हे साम्राज्य इ.स.पू. ३२२ मध्ये चंद्रगुप्त मौर्य याने नंद घराण्याला पराभूत करून स्थापन केले. त्याने त्याकाळच्या भारतातील सत्तांच्या विसंवादाचा फायदा उठवून आपल्या साम्राज्याचा पश्चिमेकडे व मध्य भारतात विस्तार केला. इ.स.पू. ३२० पर्यंत या साम्राज्याने सिकंदरच्या प्रांतशासकांना (क्षत्रप) हरवून पूर्णपणे वायव्य भारत ताब्यात घेतला होता.[२]
- हे साम्राज्य उत्तरेला हिमालय, पूर्वेला आसाम, पश्चिमेला पाकिस्तान, अफगाणिस्तान व इराणचे काही भाग इतके पसरले होते. भारताच्या मध्य व दक्षिण प्रदेशांमध्ये चंद्रगुप्त व बिंदुसार यांनी कलिंग (सध्याचा ओरिसा) हा प्रदेश वगळता विस्तार केला. नंतर सम्राट अशोकाने कलिंग जिंकून घेतला. अशोकांच्या मृत्यूनंतर साठ वर्षांनी मौर्य साम्राज्याचा अस्त झाला. इ.स.पू. १८५ मध्ये शुंग साम्राज्याने मौर्यांना पराभूत करून मौर्य साम्राज्य संपुष्टात आणले.
- चंद्रगुप्ताने आपल्या कारकिर्दीत सिंधू नदीपलीकडील अलेक्झांडरच्या साम्राज्याचा प्रदेश जिंकून घेतला. चंद्रगुप्ताने सेल्युकस निकेटर याला पराभूत करून इराणचेही काही भाग जिंकून घेतले. ग्रीक सेनापती युडेमस व पिथोन यांनी इ.स.पू. ३१६ पर्यंत राज्य केले. नंतर चंद्रगुप्ताने चाणक्याच्या मदतीने (जो त्याचा आता सल्लागार होता) त्यांना पराभूत केले.
- या साम्राज्याची लोकसंख्या अंदाजे ५ ते ६ कोटी इतकी होती व हे साम्राज्य हे जगातील लोकसंख्येनुसार मोठे साम्राज्य होते.
- मुद्राराक्षस या काव्यात विशाखदत्ताने चंद्रगुप्त मौर्य हा नंदांचा नातलग असल्याचे लिहिले आहे. प्राचीन बौद्ध धर्मग्रंथात (महावंश व दीपवंश )एक *मौर्य* नावाच्या क्षत्रिय जमातीचा उल्लेख आहे. ब्राह्मणी परंपरेनुसार चंद्रगुप्त मुरा या नंदाच्या दरबारातील शूद्र स्त्री च्या पोटी जन्माला आला असावा.
- चाणक्य म्हणजेच विष्णु गुप्त म्हणजेच कौटिल्यचे अर्थशास्त्र , मेगास्थेनीस चा इंडिका ग्रंथ ( मेगास्थेनीस हा सेल्युकास निकेटरचा मौर्य दरबारातील दूत ) आणि अशोकचे कोरीव लेख हे या काळाची माहिती देणारी प्रमुख साधने.




## चंद्रगुप्त मौर्य( इ. स. पू. 322 ते इ. स. पू. 297)

- . इ.स.पू. ३०५ मध्ये झालेल्या या लढाईत चंद्रगुप्ताने सेल्युकसचा पराभव केला. त्यानंतरच्या तहानुसार सेल्युकसच्या मुलीचा चंद्रगुप्ताबरोबर विवाह झाला.
- तर कंभोज-गांधार (पॅरोपॅमिसेड), कंदाहार (अराकोसिया) व बलुचिस्तान (जेड्रोसिया) हे प्रांत मौर्य अधिपत्याखाली आले.. दोन्ही देशांत राजनैतिक संबंध दृढ झाले.
- मेगॅस्थनिस, डिमॅकस व डायोनिसस हे ग्रीक इतिहासकार चंद्रगुप्ताच्या दरबारात राहत.
- गुजरात राज्यातील जुनागढजवळ सम्राट चंद्रगुप्त मौर्या ने ‘सुदर्शन’ नावाचे धरण बांधलेले होते.
-

## बिन्दुसार ( इ. स. पू. 297  ते इ. स. पू. 272)

- चंद्रगुप्ताचा मुलगा बिन्दुसार
- . त्याच्या कारकीर्दीत मौर्य साम्राज्याचा दक्षिणेत कर्नाटकमध्ये विस्तार झाला. त्याचा मृत्यू इ.स.पू. २७२ मध्ये झाला.
- याच्या काळात तक्षशीला येथे बंद झाले. हे बंद मोडून काढण्यासाठी अशोकला पाठवले.

- याने आजीविक पंथाचा स्वीकार केला. (निर्बंधांची उपेक्षा करून तसेच नियतीवर भरवसा ठेवून स्वाभाविक प्रवृत्तीने जगावे, असे तत्त्व स्वीकारणारा संप्रदाय, असा 'आजीव' म्हणजे मुक्त जीवन याचा अर्थ असावा.)

- ग्रीक लेखकांनी याचा उल्लेख अमित्रघट असा केला आहे. पुराणात त्याचा भद्रसार असा उल्लेख आहे.

## अशोक (इ.स.पू. २७३ ते इ.स.पू. २३२)

- चंद्रगुप्ताचा नातू (बिन्दुसाराचा मुलगा) दीपवंश ग्रंथात अशोकाने आपल्या 99 भावांना ठार मारून गादी संपादन केली असा उल्लेख .अशोक सर्वात लहान . अगोदर तक्षशीला व उज्जैन प्रांताचा राज्यपाल

- प्रत्यक्ष लोकांच्या भाषेत बोलणारा पहिला राजा .

- अशोक राजपुत्र असताना त्याने उज्जैन व तक्षशिला येथील बंडे मोडून काढली.

- त्याने दक्षिण भारतात मौर्य राजवट पुनर्स्थापित केली. कलिंगचे युद्ध हा त्याच्या जीवनातील सर्वांत महत्त्वाचा प्रसंग ठरला. घनघोर युद्धानंतर अशोकाने कलिंगच्या सैन्याचा पराभव केला. या युद्धात व नंतरच्या कत्तलीत अंदाजे १,००,००० सैनिक व नागरिक या युद्धात मरण पावले. हे पाहिल्यावर त्याला इतके घोर युद्ध करून लाखो लोकांच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याचा पश्चात्ताप झाला. कलिंग जिंकल्यावर त्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्याने हिंसा व युद्ध यांचा त्याग केला.13 क्रमांकाच्या मोठ्या शिललेखात याचा उल्लेख आहे.

- वायव्ये स अफगाणि स्ता न आणि उत्तरेस नेपाळपासून दक्षि णेस कर्ना टक आणि आंध्र प्रदेशापर्यंत, तसेच पूर्वेस बंगालपासून पश्चि मेस सौराष्ट्रापर्यंत साम्राज्य.

- अशोकाचे साम्राज्य पसरले होते.

- अशोकाने अहिंसा, प्राण्यांची शिकार न करणे (सम्राट अशोकाच्या दि ल्ली-टोपडा येथील एका लेखात वटवाघळे, माकडे, गेंडे इत्या दींची शि कार करू नये, जंगलात वणवे लावू नयेत असे सक्त निर्बं ध)

- लिहून ठेवले होते.तसेच गुलामगिरीची प्रथा बंद केली. कलिंग युद्धातील पराभूतांना सक्तीने गुलाम केलेल्यांना मुक्ती दिली गेली. त्याने बौद्ध विचारांचा प्रसार केला.

- दगडामध्ये कोरलेले अशोकाचे शिलालेख संपूर्ण भारतीय उपखंडात अतिपश्चिमेकडील अफगाणिस्तानपासून दक्षिणेकडे नेल्लोर जिल्ह्यातही ते आढळतात. या शिलालेखांवर अशोकाची धोरणे व कार्य लिहिले आहे. प्रामुख्याने हे शिलालेख प्राकृत भाषेत लिहले गेले आहेत, तरी दोन शिलालेख ग्रीकमध्ये तर एक ग्रीक व एक ॲरेमाइक भाषेमध्ये लिहला गेला आहे. हे शिलालेख विशेष करून ब्राह्मी लिपीत आढळतात. वायव्य भगत ग्रीक आणि अरेमाइक भाषा दिसून येते.

मोठे शिलालेख : 14 लेख 8 ठिकाणी.- मनेसारा , शाहबाजगढी , कलसी, धौली, जोगर, सोपारा, गिरनार, एरागुडी
छोटे शिलालेख : मसकी, गुर्जरा, रूपनाथ, एरागुडी.
स्तंभ लेख : 7 लेख 6 ठिकाणी : दिल्ली मध्ये टोपरा व मेरठ, लौरिया मध्ये नंदगढ व अरेराज , प्रयाग , रामपूर्व

- कोरीव लेखांवर देवनाम प्रिय दासी म्हणजे देवाचा लाडका असा उल्लेख आहे .
  जवळ जवळ .ठिकाणी कोरीव लेख सापडले 47

### कुणाल आणि संप्रती व बृहद्रत्र:

- अशोकाच्या मृत्यूनंतर ( इ. स. पू. 232 ) साम्राज्य दोन भगत विभागले गेले. 1) पूर्वेकडील प्रदेश व 2) पश्चिमेकडील प्रदेश

- पश्चिमेकडील प्रदेशावर कुणाल आणि संप्रती यांनी तर पूर्वेकडील भागावर बृहद्रत्र याने पाटलीपुत्र हून राज्य केले.

- इ. स. पू. 187 मध्ये बृहद्रथाला त्याचाच ब्राह्मण सर सेनापती पुष्यमित्र याने मारून मौर्य सत्ता ताब्यात घेऊन शुंग घराण्याची स्थापना केली.

धर्म :

- मौर्यकाळात आरंभी जैन धर्म साम्राज्याचा प्रमुख धर्म होता. पुढे सम्राट अशोकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून त्याचा देशभर - जगभर प्रसार केला. सम्राट अशोकांच्या काळात बौद्ध धर्म हा अखंड भारताचा राजधर्म होता.
- त्याने बोधगयापासून धर्मयात्रा सुरू केली. तसेच पुढे जाऊन धम्ममहामात्रास नावाचे मंडळ सुरू केले. तसेच त्यांनी श्रीलंकेमध्ये आपला मुलगा महेन्द्र व मुलगी संघमित्रा यांना पाठवून तेथे बुद्ध धर्माचा प्रसार केला. तेथील राजा तिसा याने बुद्ध धर्माचा स्वीकार केला. अशोकाने पश्चिम आशिया, ग्रीस व आग्नेय आशिया येथे अनेक धर्मप्रसारक पाठवले.

## मौर्य कालीन राज्यव्यवस्था

मौर्य साम्राज्या ची राजधानी पाटलिपुत्र येथे होती.
राज्यकारभाराच्या सोईसाठी साम्राज्या चे चार वि भाग पाडलेले होते. प्रत्ये क वि भागाची स्वतंत्र राजधानी होती.
१. पूर्व वि भाग - तोशाली (ओडि शा),
२. पश्चि म वि भाग - उज्जयि नी (मध्य प्रदेश),
३. दक्षि ण वि भाग - सुवर्णगि री
(कर्ना टकातील कनकगि री),
४. उत्तर वि भाग - तक्षशिल ा(पाकि स्ता न)
राज्यकारभारात राजाला सल्ला देण्या साठी मंत्रिपरिषद असे. 27 मंत्र्यांचा उल्लेख ०

| मंत्री | विभाग | मंत्री | विभाग |
|---|---|---|---|
| पण्याध्यक्ष | व्यापार | लक्षणाध्यक्ष | नाणी पाडणे. |
| संस्थाध्यक्ष | बाजार | अक्षपटलाध्यक्षा | हिशोब |
| पौतयाध्यक्ष | वजन व मापे. | मनाध्यक्ष | मापन |
| नावाध्यक्ष | राज्यातील नावा | पट्टणाध्यक्ष | बंदरे |
| शुल्काध्यक्ष | टोल व जकात | गणिकाध्यक्ष | दरबारातील काम |
| आकाराध्यक्ष | खाण | देवताध्यक्ष | धार्मिक काम |


दोन प्रकारचे हेर राज्यात होते 1) संस्था- एखाद्या सार्वजनिक ठिकाणी बसून काम 2) संचारी – फिरते काम
पुलीसणी : हा अधिकारी लोकांची मते राजाला जाऊन सांगायचा.
प्रतिवेदका : हा राजाचा विशेष खबऱ्या असायचा .
गूढ पुरुष ; हा राजाचा गुप्त एजंट .
राज्य चार भागात विभागलेले: प्रत्येक भागावर एक राज्यपाल

जिल्हा प्रशासन:
तीन अधिकारी ; 1) प्रादेशिका – प्रशासन
2) रजुका : महसूल आणि न्याय
3) युत्का : हिशोब

ग्राम प्रशासन : 5 ते 10 गावांचा समूह ज्याला तालुका म्हणता येईल . त्याचे प्रशासन गोपा ( हिशोब ) व स्थानिक ( कर गोळा करणे) ह्यांच्याकडे . गावचा प्रमुख ह्यांना जबाबदार.

शहर प्रशासन : सहा मंडळे त्यात प्रत्येकी 5 सदस्य .
नगरीक हा शहरचा प्रमुख. त्याच्या मदतीला स्थानिक आणि गोप

कर आणि महसूल : जमीन महसूल हा प्रमुख स्त्रोत. शेतकरी आपल्या उत्पन्नाच्या ¼ एवढा कर भाग म्हणून तर अतिरिक्त कर बळी म्हणून देत असत. पाणी कर सुद्धा होता. गावांच्या समुहावर पिंडारक नावाचा कर तर कर हा फळे व फुलांच्या उत्पन्नावर. हिरण्य नावाचा फक्त पैशाच्या स्वरुपात घेतला जाणारा कर होता.



भारताची राजमुद्रा सारनाथ येथील अशोकस्तंभाच्या आधारे तयार करण्या त आली आहे.
सारनाथ येथील मूळ स्तं भावर चार सिह आहेत.प्रत्येक सि हाच्या प्रतिमेखाली आडव्या पट्टीवर चक्रआहे. त्यां पैकी आपणांस एकच चक्र पूर्ण पणे दिसते.चक्राच्या एका बाजूस अश्व व दुसऱ्या बाजूस वृषभ आहे. राजमुद्रेची जी बाजू दि सत नाही त्या बाजूवर अशाच पद्धतीने हत्ती आणि सि ह हे दोन प्राणीही आहेत.

मौर्य काळातील काही वैशिष्ट्यपूर्ण बाबी.

- आर्थिक जीवन : आर्थिक घडामोडींसाठी 27 अध्यक्षांची नेमणूक .
- जलसिंचनाची सोय राज्यामार्फत.
- गुलामाची नेमणूक शेतीकामासाठी.
- या काळात जळमार्ग होते.
- कर निर्धारणाला महत्व : संहर्ता - कर निर्धारणाची जबाबदारी या अधिकाऱ्यावर. सन्निधता – खजिन्याचा व भांडाराचा प्रमुख अधिकारी.
- नाणी मुख्यत्वे चांदीपासून : मोर , टेकडी व चंद्रकोर या प्रतिमा नाण्यावर.
- या काळात लोखंड हा धातू सहज उपलब्ध होता. त्यापासून पोलाद बनवण्याची कला त्यांनीच प्रस्थापित केली. नौकाबांधणी हाही एक मोठ्या प्रमाणावरील उद्यो ग होता
- पाटलीपुत्र येथे लाकडी बांधकाम असल्याचा उल्लेख - मेगास्थेनीस
- वलयाकृती विहिरी याच काळात बांधल्या गेल्या. वापर – शहरांना पाणीपुरवठा
- बांग्लादेश येथील बोग्रा महास्थान मौर्य कालीन कोरीव लेख ब्रह्मी लिपीत.
- उत्तर भारतात तसेच प. बंगाल मधील 24 परगणा जिल्ह्यात चंद्रकेतुगढ येथे काळी व चकचकीत भांडी सापडली.
- कला : कुम्रहर येथे दगडी स्तंभाचे अवशेष आढळतात हे स्तंभ फिक्कट पिवळ्या व मातकट रंगामध्ये. त्यावर सिंह व बैल यांची चित्रे . हे पाटणा शहरच्या सरहद्दीवरील ठिकाण
- बौद्ध भिक्षु साठी राहण्याची सोय दगड कोरून निर्माण केलेल्या गुहांमध्ये – बारबर गुहा गयेपासून 30 किमी
- सोंगट्यां चा खेळ आणि बुद् धि बळ यांसारखे खेळ आवडीने खेळले जात. बुद् धि बळाला ‘अष्टपद’ असे नाव होते.

**मौर्य साम्राज्याची अस्ताची कारणे.**

- ब्राह्मणी प्रतिक्रिया : मौर्यांनी जैन व बौद्ध धर्माचा पुरेयस्कर केला. त्यामुळे ब्राह्मण वर्गाचे महत्व कमी झाले.
- आर्थिक संकट: लष्करावर अफाट खर्च. अशोकाच्या दानधर्मामुळे खजिना रिकामा .
- भारताच्या वायव्य सरहीकडे दुर्लक्ष : शक टोळ्यांना मार्ग मोकळा झाला. सिथियनांनी भारतात यायला सुरुवात केली.
- इ. स. पू. 185 छाय सुमारास पुष्यमित्र शुंग याने शेवटचा राजा बृहद्रथ याला ठार मारले. पुष्यमित्र हा त्याचा ब्राह्मण सेनापती.

# मौर्योत्तर काळातील परकीय सत्ता

## इंडो ग्रीक / बॅक्ट्रियन ग्रीक : ( इ. स. पू. 200 ते इ. स. पू. 300 )

- सेल्युकस निकेटरच्या मृत्यूनंतर ग्रीकांच्या मेसेडोणीया राज्याची दोन शकले. (बॅक्ट्रिया आणि सिरिया )
- इ. स. पू. 85 मध्ये बॅक्ट्रियन राजा दिमित्रीयस याने भारतावर आक्रमण केले. त्याने मध्ये प्रदेशपर्यंत मजल मारली.
- एकछत्री अंमल प्रस्थापित करता आला नाही.

## मिनांदर किंवा मिलिंद ( इ. स. पू. 165 ते इ. स. पू. 145)

- हा प्रसिद्द इंडो ग्रीक राजा मिलिंद महणून प्रसिद्ध ( स्वात नदीच्या खोऱ्यात सापडलेल्या खरोष्टी लिपीतील या दोन शिललेखात ह्याचा पुरावा)
- सकल किंवा सियालकोट ही राजधानी .
- नागसेन किंवा नगार्जुन या बौद्ध भिकखू ने त्यास बौद्ध धर्माची दीक्षा दिली.
- मिलिंद ने त्याला विचारलेल्या प्रश्नांची त्याने जी उत्तरे दिली ती मिलिंदपन्हो किंवा मिलिंदचे प्रश्न या पुस्तकात .
- सुवर्णाची नाणी इंडो ग्रीकांनी प्रथम भारतात आणली.

## शक :

- ग्रीकानंतर शकांनी भारतावर आक्रमण केले. ( इ. स. पू. तीसऱ्या शतकपासून )
- मध्य आशियात शक तिग्रखौदा , शक हौमवर्गा , शक तरदर्या या तीन राजांचा प्रभाव होता.
- शकांच्या पाच शाखा . एक – अफगाणिस्तान , दुसरी – पंजाब (राजधानी तक्षशीला ) , तिसरी – मथुरा ( 200 वर्षे राज्य ) , चौथी पश्चिम भारत , आणि पाचवी – दक्खणच्या उत्तर भाग
- इ. स. पू . पहिल्या शतकातील क्षकांच्या हालचाली विषयी वर्णन – पेरीप्लस ऑफ द यूरोपियन सी. यामध्ये. त्याकाळात महाराजा मोझेस हा शकांचा श्रेष्टतम राजा.
- नहपान: नहपान हा महाराष्ट्रातील भुमक क्षत्रपा चा राजा. त्याची चांदीची नाणी सापडली. गौतमिपुत्र सातकर्णी याने त्याचे राज्य संपूष्टात आणले.
- रुद्रदमन : इ. स. पू .130 च्या दरम्यान उज्जैणीचा शक क्षत्रापि होता. ( जुनागड येथे त्याचा प्रसिद्ध शीलालेख सापडला.) त्याने आपली राजकन्या सातवाहन सम्राटास दिली. त्याने गीरणार मधील सुदर्शन तलावाची दुरूस्ती केली. त्याला संस्कृत भाषेची आवड होती.

## पार्थियन : ( पहिले शतक )

- प्राचीन ग्रंथात उल्लेख शक पहलव असा. ते मुळचे इराणचे. वायव्य भारतात छोटासा भाग.
- गोंदाफेरस हा त्यांचा राजा.

**कुषान :**

- शक टोळ्यांच्या बरोबर चीनमधील युएची टोळ्यांचा संघर्ष सुरू झाला होता.
- हिंदुकुश ओलांडून त्या काही काल ओक्सास नदी किनारी स्थिरावल्या. त्याठिकाणी पाच टोळी राज्य उदयाला आली . त्यापैकि किओ शूआंग ही एक टोळी जी पुढे कुषान बनली.
- कुषानांच्या या टोळ्या काबुल परिसरात स्थिरावल्या. येण कोब चेव हा पहिला राजा. शक आणि पार्थियन यांना शह देऊन सिंधु नदीच्या दक्षिण खोऱ्यात राज्य वसवले.
- कुषांनांचे तीन ख्यातकीर्त राजे. 1) कुजूल कॅडफिसिस 2) विम कॅडफिसिस 3) कनिष्क
- कनिष्क घराणे :
  सर्वात प्रसिद्द राजा . इ. स. 78 मध्ये सत्तेवर आला. त्याने शक संवत सुरू केले.
  काश्मीर ताब्यात घेतला. काश्मीर पासून बनारस पर्यन्त भाग ताब्यात घेतला. पुरुषपूर व मथुरा अशा दोन राजधान्या. त्याने मगध राज्यावर हल्ला करून पाटलीपुत्र जिंकले. तिथला रहिवासी अश्वघोष याला आपल्या दरबारी ठेवले. ज्याने बुधचरित तसेच सौंदरानंदव वज्रसूची लिहिले. सारनाथ च्या शीलालेखात त्याचा उल्लेख.
  त्याने बौद्ध धर्माचा पुरस्कार केला. काश्मीर मध्ये चौथी धर्मपरिषद त्याच्या काळात भरली. ठिकाण – श्रीनगर जवळील कुंडलीवण . अश्वघोष , नागर्जुन , वसुमित्र व पार्श्व हे उपस्थित . महाविभाषा हा प्रसिद्ध ग्रंथ या परिषदेत सिद्ध झाला. या ग्रंथा स बौद्ध चिंतंनाचा ज्ञान कोश मानला जातो.
  पेशावर येथे सर्वात मोठा विहार बांधला. चीन , जपान , तिबेट या देशात बौद्ध धर्माचा प्रसार केला.
  संस्कृत साहित्याचा पुरस्कर्ता. कनिष्क राजा महायान पंथाचा आश्रयदाता होता.
  कनिष्काच्या वारसाने सन 230 पर्यन्त वायव्य भारतात राजी केले.
  ससानी या इराणी सत्तेने तिसऱ्या शतकाच्या मध्यावर कुषानांचे अफगाणिस्तान व सिंधुच्या पश्चिमेकडील साम्राज्य जिंकून घेतले. पुरुषपूर व मथुरा अशा दोन राजधान्या.
  कनिष्काच्या दरबारात चरक हा प्रसिद्ध वैद्य होता.

कनिष्का चे सोन्या चे नाणे :हे नाणे सम्राट कनिष्काने पाडले होते. या नाण्याच्या दर्शनी बाजूवर ग्रीक लिपीत लिहिल 'शाओ नानोशाओ कनेष्की कोशानो' असा लेख आहे. याचाअर्थ 'राजाधि राज कनि ष्क कुशाण' असा आहे.नाण्या च्या मागील बाजूस गौतम बुद्धाची प्रतिमा आहे आणि बाजूला ग्रीक लिपीत 'बोद्दो' म्हणजेबुद्ध लिहिल आहे.

## मध्य आशिया सोबतच्या संपर्काचे परिणाम :

- ✓ शक आणि कुषान काळात बांधकाम खेतरत प्रगती झाली.
- ✓ शक आणि कुषाण यांनी उत्तम घोडदळ सैन्यात आणले.
- ✓ कुषानांचे रेशीम मार्गावर नियंत्रण होते.
- ✓ सोन्याची नाणी मोठ्या प्रमाणात चलनात आणली.
- ✓ इलाखा पद्धत कुषानांनी सर्वप्रथम सुरू केली.
- ✓ गांधार येथे ग्रीक व रोम यांच्या संपर्कातून गांधार कलाशैलीचा उदय झाला.
- ✓ राजा कनिष्काचा मस्तक हीन पुतळा मथुरा येथे आहे.
- ✓ रुद्रदमन च्या जुनागड येथील कोरीव लेखात संस्कृत काव्यशैली आढळते.
- ✓ या काळातील महावस्तू व दिव्यवादन हे दोन ग्रंथ बौद्ध धर्माच्या उपदेशाचे.
- ✓ वात्सयानाचे कामसुत्र याच काळातील .
- ✓ चामड्याची बूट बनवण्याची कला याच काळातील.
- ✓ या काळात काचेच्या वस्तु बनवल्या जात होत्या.

# मौर्योत्तर काळातील देशी सत्ता

शुंग घराणे (इ .पू.स.१८५ ते इ७३ .पू.स.)

याची स्थापना पुष्यमित्र ( ब्राह्मण ) याने इ१ .पू.स.८५ मध्ये केलीत्यांनी एकूण ११० .या घराण्यात एकूण दहा राजे होऊन गेले .
वर्षे मगधावर सत्ता गाजवली.

- पूष्यमित्राने छत्तीस वर्षे मगधावर राज्य केले.
- पुष्यमित्राची राजधानी पाटलीपुत्र येथे होती.
- इ१७५ .पू.स. च्या सुमारास मिनँडर या ग्रीक राजाने हिंदुस्थानवर स्वारी केली होती. सिंध, काठेवाड व पश्चिम किनार्यावरील काही भाग त्याने जिंकला. मथुरा नगरी जिंकून तो पाटलीपुत्रावर चाल करून आला त्यावेळी पुष्यमित्राने त्याच्याशी लढाई करून त्याला हिंदुस्थानाबाहेर हाकलून लावले .
- कालिदासचे मालविकाग्नीमित्र हे नाटक पुष्यमित्र याचा मुलगा अग्निमित्र व मालविका यांच्या प्रेमाविषयी आहे.
- अयोध्या शीलालेख तसेच पतंजली च्या महाभाष्यात पुष्यमित्र याने दोन अश्वमेध यज्ञ केले असा उल्लेख आहे.
- शुंग आणि कालिंगच्या खारवेल यांचा संघर्ष हत्तीगुंफा शिलालेखातून स्पष्ट होतो.
- पुष्यमित्राचा मुलगा अग्निमित्र याने विदर्भावर स्वारी करून तो प्रांत शुंग घराण्याच्या अमलाखाली आणला .
- अग्निमित्रानंतर शुंग घराण्यातील महत्वाचा राजा म्हणजे भागभद्र होय .त्याने बेसनगर म्हणजेच विदिशा ही राजधनि केली.
- भागभद्रानंतर आलेला देवभूती यानेही काही फारसी चांगली कामगिरी केली नाहीदेवभूतीच्या काळात वसुदेव हा त्याचा . .प्रधान होता कण्व घराण्यातील या वसुदेवानेच देवभूतीला ठार केले त्यासाठी एका दासीची मदत घेतली. व शुंग घराण्याचा शेवट होऊन मगधावर कण्व घराण्याची सत्ता स्थापन झाली.
- या काळातील कास्यांची नाणी सापडली.

कण्व घराणे (इ.स.पू. ७३ ते इ.स.पू. २८)

- याची स्थापना वसुदेव याने इ.स.पू. ७३ मध्ये केली होती. वसुदेवानेच देवभूतीला ठार करून मगधाचे राज्य बळकावले व तेथून पुढे मगधावरील शुंगांची सत्ता जावून तेथे कण्व घराण्याची सत्ता चालू झाली.

- वसुदेव धरून कण्व घराण्यात एकूण चार राजे झाले .वासुदेव २ .१ .भुमीमित्र ३नार .ायण ४(सुशर्मा) सुसामन .
- .स२८ मध्ये या घराण्यातील शेवटचा राजा सुशर्मा याला .पू. सातवाहन घराण्यातील सिमुका याने ठार मारून मगधावर आपली सत्ता प्रस्थापित करून कण्व घराण्याचा शेवट केला.

चेदी किंवा खारवेल घराणे :

- शुंग घराण्याच्या समकालीन . संस्थापक : महामेघ वाहन
- अशोकाच्या मृत्यूनंतर कमकुवत झालेल्या मौर्य साम्राज्यातून बाहेर पडून याची निर्मिती. कलिंग येथे.
- हत्तीगुंफा शिला लेखातून माहिती मिळते. ते जैन धर्माचे पुरस्कर्ते असावेत.
- खारवेल शासकांनी सातवाहन शासक सातकर्णी पहिलं याच्याशी युद्ध केले.